लोकमत

# विद्यापीठात एमबीए प्रवेशासाठी आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एमबीए विभागाने केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेनंतर संभाव्य रिक्त जागांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी एमबीए विभागाशी गुरुवार (दि. २३) पर्यंत संपर्क साधावा.

पुढारी



# विद्यापीठात एमबीए अभ्यासक्रमासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात एमबीए, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर संभाव्य रिक्त जागांसाठी प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत. एमबीए प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी २३ डिसेंबरपर्यंत विभागाशी संपर्क साधावा. रिक्त जागांवर होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन एमबीए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

21 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राचार्य रा. तु. भगत यांच्या पुस्तकाचा सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठ लेखक, संत साहित्याचे अभ्यासक प्राचार्य रा. तु. भगत यांच्या 'राजर्षी शाहू छत्रपती : चरित्र व शिक्षण कार्य' या पुस्तकाचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. पुण्यातील एस.पी. कॉलेजमधील एस.वाय.बी.ए. मराठी विषयाच्या अभ्यासक्रमांत पुढील तीन वर्षांसाठी या पुस्तकाचा समावेश करण्यात आला आहे.

यापूर्वी प्राचार्य भगत यांचे 'शिक्षणसूर्य सानेगुरुजी' व 'सानेगुरुजी गौरव ग्रंथ' हे दोन्ही ग्रंथ शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मराठी अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून मान्य करण्यात आले आहेत. तसेच 'महात्मा जोतिराव ते कर्मवीर भाऊराव' या पुस्तकालाही शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमासाठी संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाने या पुस्तकाला उत्कृष्ट पुस्तक म्हणून पुरस्कारही दिला आहे.